# स्थानिक गुन्हे शाखा,नाशिक ग्रामीण

पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण,आडगाव, नाशिक-पिन ४२२००३

दुरध्वनी नंबर ०२५३-२३०९७१० E.Mail- pilcbnskr@gmail.com


---

## प्रेसनोट

दिनांक :- ०४/१०/२०१८

### बॅक परिसरात पाळत ठेवुन वयोवृध्द इसमांची फसवणुक करणारी टोळी गजाआड

### स्थानिक गुन्हे शाखेचे पथकाची कारवाई

---

दिनांक २६ सप्टेंबर २०१८ रोजी दुपारचे सुमारास कासारवाडी, ता.सिन्नर येथील वयोवृध्द शेतकरी श्री. शिवाजी दशरथ शेळके यांनी नांदुरशिंगोटे येथील बॅक ऑफ महाराष्ट्र शाखेतुन ७३,००० रू. रोख रक्कम काढली व त्यानंतर ते बॅकेतुन बाहेर येताच त्यांना एक अनोळखी इसम भेटला, व त्यांना म्हणाला की मला माझे पाहुण्यांना ७५ हजार रूपये द्यायचे आहे, माझेकडे २ लाख रूपये असुन सर्व ०२ हजार रूपयांच्या नोटा आहे, तरी तुम्ही मला थोडयावेळाकरीता तुमचेकडील ७३ हजार रूपये द्या व माझेकडील ०२ लाख रूपये तुमचेकडे ठेवा, असे बोलुन सदर अनोळखी इसमाने फिर्यादीकडुन ७३ हजार रोख घेवुन फसवणुक केली होती. सदर बाबत **वावी पोलीस ठाणेस I गुन्हा रजि.नं. १९७/२०१८ भादवि कलम ४२०** प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांनी जिल्हयातील नाउघड मालाविरूध्दचे गुन्हयांचा आढावा घेवुन गुन्हे उघडकीस आणणेसाठी मार्गदर्शन करून सुचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पथकामार्फत वरील गुन्हयाचा समांतर तपास सुरू होता. दरम्यान स्थागुशाचे पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी वरील गुन्हयातील फिर्यादी यांचेकडेस घडले प्रकाराबाबत सविस्तर चौकशी करून नांदुरशिंगोटे येथील बॅक ऑफ महाराष्ट्र आवारातील सी.सी.टी. व्ही.फुटेजची पडताळणी केली, त्यात फिर्यादीची फसवणुक करणारे इसमासह त्याचे सोबत असलेले संशयीत इसमांवर लक्ष केंद्रीत करण्यात आले. **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे** यांनी सदर गुन्हयातील अज्ञात आरोपीतांचे गुन्हा करण्याचे पध्दतीवरून गोपनीय माहिती मिळवुन पथकास नाशिक शहर व लगतचे तालुक्यात रवाना केले. त्यानुसार पथकातील अधिकारी व कर्मचारी यांनी येवला तालुका परिसरातुन संशयीत इसम नामे **१) राहुल रविंद्र नागरे, वय ३१, रा. मातुलठाण, ता.येवला** यास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेले इसमास विश्वासात घेवुन चौकशी केली असता, त्याने गेले हप्ताभरापुर्वी त्याचे नाशिक शहरातील साथीदारांसह नांदुरशिंगोटे येथील बॅक ऑफ महाराष्ट्र परिसरातुन एका **वयोवृध्द इसमाकडुन ७३ हजार रोख रूपये हातचालाखीने फसवणुक करून काढुन घेतले असल्याची कबुली** दिली आहे. सदर आरोपीचे नाशिक शहरातील साथीदार नामे **२) बाळु राजाराम बोरकर**, वय ३४, रा. श्रमिकनगर, सातपुर, **३) ज्ञानेश्वर उर्फ नाना नामदेव पोमनार**, वय २९, रा. सदगुरूनगर, सातपुर यांना सातपुर परिसरातुन ताब्यात घेण्यात आले आहे. ताब्यात घेतलेले आरोपीतांनी मिळुन सदर गुन्हा केला असल्याचे कबुल केले असुन त्यांचे कब्जातुन गुन्हयात वापरलेली स्पार्क कार क्र.एचएच ०४-ईएफ-३६४८ ही जप्त करण्यात आली आहे. वरील गुन्हयाचे पुढील तपासकामी आरोपीतांना वावी पोलीस ठाणेस हजर करण्यात आले आहे. यातील **आरोपी राहुल नागरे** याचेविरूध्द येवला तालुका पोलीस ठाणेस चोरीचा गुन्हा दाखल असुन त्याने व त्याचे साथीदारांनी मिळुन अशा प्रकारचे अजुन काही गुन्हे केले असल्याची शक्यता आहे.

ग्रामीण पोलीस दलातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, बॅंकामध्ये येणारे अनोळखी इसमांचे भुलथापांवर विश्वास ठेवु नका, सुट्टे पैसे नाहीत, पैसे मोजुन देतो / पैसे ऑनलाईन ट्रान्सफर करून देतो / तुमचे पैसे पडले आहेत/ तुमच्या अंगावर घाण पडली आहे अशा विविध भुलथापा देवुन हातचलाखीने फसवणुक करून पैसे लुटमार करणारे संशयीत इसम आढळुन आल्यास नजीकचे पोलीस ठाण्यास तात्काळ संपर्क साधा.

नाशिक ग्रामीण जिल्हयाचे **पोलीस अधीक्षक श्री. संजय दराडे सो.** व अपर पोलीस अधीक्षक **श्री. विशाल गायकवाड सो.** यांचे मार्गदर्शन व सचुनांप्रमाणे **स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. अशोक करपे**, पोलीस उपनिरीक्षक **श्री. स्वप्निल नाईक**, पोहवा रविंद्र वानखेडे, प्रकाश चव्हाणके, दिलीप घुले, सुधाकर खरोले, पोना प्रितम लोखंडे, रावसाहेब कांबळे, भरत कांदळकर, पोकॉ भाउसाहेब टिळे, किरण काकड, निलेश कातकाडे, प्रदिप बहिरम, हेमंत गिलबिले, संदिप लगड यांचे पथकाने नाशिक शहर व येवला परिसरातुन सदर आरोपीतांना ताब्यात घेवुन वरील गुन्हा उघडकीस आणलेला आहे.